**नि.दि.दा.क्र. ३६/२०१२**

**नि. १७७ व ३०१ लगत**

**उलटतपास प्रतिवादी क्र.१ ते ५ तर्फे ॲड. टी.आर.पवार यांच्यातर्फे सुरु–**

हे म्हणणे खरे आहे की दशरथ विठ्ठल माने हे माझे चुलते आहेत व गौतम विठ्ठल माने हे माझे वडील आहेत. हे म्हणणे खरे नाही की ते दोघेही शिकलेले होते. हे म्हणणे खरे नाही की केसची जास्त माहिती दशरथ विठ्ठल माने यांनाच आहे. हे म्हणणे खरे नाही की दशरथ माने यांनी मला मुखत्यारपत्र दिलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की दशरथ विठ्ठल माने यांना या केस बाबत काहीही माहिती नाही. हे म्हणणे खरे आहे की त्यांना केसची माहिती आहे. हे म्हणणे खरे आहे की दावा दशरथ व गौतम यांच्या वारसांनी दाखल केला. हे म्हणणे खरे आहे की सर्व्हे नं.१०८८/२/अ मधील हायब्रीड ज्वारी चोरुन नेल्याबाबत गौतम, विठ्ठल व दशरथ यांच्या विरुद्ध फौ.ख.क्र.६८/१९८० हा दाखल झाला होता. हे म्हणणे खरे आहे की सदरची फिर्याद मयत प्रतिवादी क्र.३ मारुती यांनी दिली होती. हे म्हणणे खरे आहे की ती तक्रार दाखल केल्यानंतर विठ्ठल तुकाराम यांनी प्रतिवादी क्र.१ ते ३ विरुद्ध नि.दि.दा.क्र.११२/१९८० हा दावा दाखल केला होता. हे म्हणणे खरे नाही की सदर दावा सर्व्हे नं.१०८८/२/अ व ८४०/४ या मिळकतीचा कब्जा मिळण्यासाठी दाखल केला होता. हे म्हणणे खरे आहे की त्या दाव्यामध्ये दरम्यानचे उत्पन्न माझ्या आजोबांनी मागितले होते. हे म्हणणे खरे नाही की नि.दि.दा.क्र.११२/१९८० हा दावा माझ्या आजोबांनी दिलेल्या माहितीप्रमाणे वकीलांनी तयार केला. सदर दाव्यात वकीलांना माहिती गौतम यांनी दिली होती. विठ्ठल हे दिनांक १४/०८/१९९३ रोजी वारले. हे म्हणणे खरे आहे की नि.दि.दा.क्र.११२/१९८० हा दावा काढून टाकला होता. हे म्हणणे खरे आहे की त्यावरील पहिले व दुसरे अपील काढून टाकले. हे म्हणणे खरे आहे की पहिल्या अपीलाचा क्रमांक ३९१/१९८८ असा होता. हे म्हणणे खरे आहे की सदर अपीलामध्ये वारस म्हणून माझे चुलते, वडील व आत्या हे होते. सदर अपीलाचे काम वडीलांनी चालवले. माझे वडील सन १९९३ मध्ये वारले.

हे म्हणणे खरे आहे की दाव्यासोबतचे मुखत्यारपत्र दिनांक २०/०९/२००० रोजी नोटरी रोकडे यांच्याकडे केले होते. सदरचे मुखत्यारपत्र माझ्या

समक्ष केले होते. मला आता मुखत्यारपत्राची छायांकीत प्रत दाखवण्यात आली. हे म्हणणे खरे आहे की त्यावर दशरथ विठ्ठल यांची सही आहे. हे म्हणणे खरे आहे की मुळ मुखत्यारपत्र मी दाव्यात सामील केलेले नाही. हे म्हणणे खरे नाही की नि.दि.दा.क्र.११२/१९८० मध्ये सन १९३० मध्ये वाटप झाले होते असे कथन माझ्या आजोबांनी केले होते. हे म्हणणे खरे नाही की त्या दाव्यामध्ये विठ्ठलच्या वाटयाला कुठल्या जमीनी व खंडेराव यांच्या वाटयाला कुठल्या जमीनी याचा तपशील त्यांनी दिला होता. हे म्हणणे खरे नाही की रि.स.नं.९४१/९, ९६४/२/ब, १०७९/१, १०८८/२/अ, १०८८/४/अ, १११०/१/अ, ११५३/२/क व ११५३/४ या मिळकती विठ्ठलच्या वाटयाला दिल्याचे लिहले होते. हे म्हणणे खरे नाही की खंडेराव यांच्या वाटणीला दिलेल्या मिळकतीचे वर्णन त्या दाव्यामध्ये केले होते. हे म्हणणे खरे नाही की रि.स.क्र.९०२/ब, ९०७/ब, ९४१/९ पैकी १०/२/अ पैकी १०७४/४/ब + ५ब, १०७९/१ पैकी १०८६/५, १०८८/२/क, १११०/अ पैकी ११५३/५/क, ११५३/५/ड व ११५३/७/ब या मिळकती खंडेराव यांच्या वाटयाला दिल्याचे नमुद केले होते. हे म्हणणे खरे आहे की ९४०/४, ९७०/१, ९७१/१ या मिळकती दावा दाखल केला त्यावेळी गहाण दिल्या होत्या. हे म्हणणे खरे आहे की त्या जमीनी नंतर सोडवल्या. हे म्हणणे खरे नाही की सदर जमीनी सोडवल्यानंतर त्या जमीनीबाबत विठ्ठल व खंडेराव यांनी वाटप केले. हे म्हणणे खरे आहे की सदरचा मजकूर नि.दि.दा.क्र.११२/१९८० मध्ये नमुद केला होता. नि.दि.दा.क्र.११२/१९८० या दाव्यातील नि.क्र.१ ची प्रत मी या दाव्यात दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की नि.दा.क्र.११२/१९८० मधील मजकूर विठ्ठल अथवा माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीमध्ये कुठेही नाकारलेला नाही.

प्रश्न – सदर मजकूर नाकारण्याकरीता विठ्ठल अथवा गौतम यांनी कुठला दावा दाखल केला होता.

उत्तर – रेकॉर्डसदरी काहीही नव्हते.

हे म्हणणे खरे आहे की नि.दि.दा.क्र.११२/१९८० हा दावा ताकीदीचा होता व तो वाटपाचा नव्हता. हे म्हणणे खरे नाही की तो दावा जर वाटपाचा असता तर त्याप्रमाणे नोंदी झाल्या असत्या. वि.दि.मु.नं.१६९/२००० हा दाखल करण्यापूर्वी

नि.दि.दा.क्र.११२/१९८० मधील मजकूराबाबत प्रतिवादी क्र.१ ते ३ यांना नोटीस दिली नव्हती. नि.दि.दा.क्र.११२/१९८० मधील वाटपाच्या मजकूराबाबत मी दोन्ही अपीलामध्ये कोणतीही तक्रार केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की वाटप झाले होते असे कथन करुनच आम्ही ताकीदीची मागणी केली होती. हे म्हणणे खरे आहे की नि.दि.दा.क्र.११२/१९८० हा दाखल केल्यामुळे माझे वडील, आजोबा व चुलते यांची फौजदारी खटल्यातुन सुटका झाली होती. हे म्हणणे खरे नाही की नि.दि.दा.क्र.११२/१९८० मधील वाटपाच्या कथनाबाबत गौतम व विठ्ठल यांनी त्यांच्या हयातीमध्ये कुठेही तक्रार केली नव्हती.

प्रश्न – नि.दि.दा.क्र.११२/१९८० मधील वाटपाचे कथन गौतम व विठ्ठल यांनी त्यांच्या हयातीमध्ये नाकारले होते हे दाखवणारा कागदोपत्री पुरावा तुमच्याकडे आहे का.

उत्तर – नि.दि.दा.क्र.११२/१९८० यामध्ये नाकारले होते. **(प्रतिवादीच्या विद्वान विधिज्ञांनी सदर उत्तरास असा आक्षेप नोंदवला आहे की, साक्षीदार हा सदर प्रश्नाचे निट उत्तर देत नाही. वादीच्या विद्वान विधिज्ञांचे असे कथन आहे की, पक्षकाराने त्याबाबत दिलेले उत्तर बरोबर आहे. त्याचा निष्कर्ष न्यायनिर्णयाच्या वेळी निर्णित करण्यात येईल.)** हे म्हणणे खरे नाही की नि.दि.दा.क्र.११२/१९८० या दाव्यामध्ये माझ्या वडीलांनी शपथेवरती पुरावा दिला होता.

**प्रतिवादी वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात आला.**

**श्रवणोत्तर स्वीकृत**

कोरेगाव — **( ए. ए.पाचरणे )**

दि. १३/०८/२०२४ — सह दिवाणी न्यायाधीश, कोरेगाव.